# धर्मांतर
# अन् धर्मांतरितांचे शुद्धीकरण

## अनुक्रमणिका


प्रकरण १ : धर्मांतराची समस्या ६

१. अर्थ आणि समानार्थी शब्द ६

२. धर्मांतराचे सर्वसाधारण प्रकार ६

३. हिंदुस्थानातील धर्मांतराचा इतिहास ६

४. हिंदूंचे धर्मांतर करण्यामागील अहिंदूंचा उद्देश ! १३

५. हिंदूंच्या धर्मांतराची व्याप्ती १४

६. धर्मांतर होण्यामागील हिंदूंचे दोष आणि अन्य कारणे २१

७. धर्मांतर केल्यानंतर हिंदूंच्या होणाऱ्या परवडीची काही उदाहरणे २३

८. धर्मांतराचे दुष्परिणाम २४

९. आध्यात्मिकदृष्ट्या धर्मांतर करणे अयोग्य ! ३०

१०. संविधानातील २५ वा अनुच्छेद आणि धर्मांतर ३१

११. हिंदु समाजाला आवाहन ३२

१२. हिंदुत्ववादी संघटनांना आवाहन ३३

१३. धर्मांतराला आळा घालण्याचे उपाय ३४

१४. धर्माधिष्ठित हिंदुराष्ट्रात हिंदूंच्या धर्मांतरावर बंदी असेल ! ३८

– धर्मांतराला अनुकूलता दर्शवणारे अयोग्य विचार आणि टीका अन् त्यांचे खंडण ३९

प्रकरण २ : धर्मांतरितांचे शुद्धीकरण ४१

१. व्याख्या ४१

२. शुद्धीकरणाविषयी धर्मशास्त्र काय सांगते ? ४१

३. शुद्धीकरणाच्या विविध पद्धती आणि विधी ४३

४. धर्मांतर करून हिंदु झालेल्यांसाठी साधनामार्ग ४४

५. शुद्धीकरणाविषयी स्वामी विवेकानंदांनी केलेले शंकानिरसन ! ४४

६. हिंदु समाजाला आवाहन ४५

# मनोगत

हिंदुस्थान आणि हिंदु धर्म यांवर काही शतकांपासून होत असलेले परधर्मियांचे धार्मिक आक्रमण म्हणजे धर्मांतराची समस्या ! इतिहासात अरबांपासून इंग्रजांपर्यंत अनेक परकियांनी हिंदुस्थानवर आक्रमणे केली. साम्राज्यविस्तारासह स्वधर्माचा प्रसार, हाच या सर्व आक्रमणांचा गाभा होता. आजही या परकियांचे वारस तेच ध्येय ठेवून हिंदुस्थानात नियोजनबद्धरित्या कार्यरत आहेत. मुसलमान 'लव्ह जिहाद'द्वारे राष्ट्र पोखरत आहे, तर ख्रिस्ती धर्मांतराद्वारे हिंदु धर्म पोखरत आहे आणि धर्मशिक्षण नसल्याने धर्माभिमानशून्य बनलेला हिंदु समाज त्याला मोठ्या संख्येने बळी पडत आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।', म्हणजे 'स्वधर्म पाळतांना मृत्यू आला, तरी परधर्म स्वीकारण्यापेक्षा तो मृत्यू श्रेयस्कर आहे', असे तत्त्व श्रीमद्भगवद्गीतेत सांगितले आहे. 'पाण्यात रहाणारा मासा तथाकथित तुपात गेला, तरी त्याचे मरण निश्चित असते, तसेच स्वधर्म सोडून परधर्मांत जाणे, म्हणजे मरण ओढवून घेणे होय', हे हिंदूंनी लक्षात घेणे आवश्यक आहे. हिंदु समाजाचे धर्मांतर करण्याचा अहिंदूंचा सुनियोजित कट, त्यासाठी त्यांना मिळणारे परकीय अर्थसाहाय्य, धर्मांतरामुळे होणारे सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिणाम इत्यादींविषयी या ग्रंथात सविस्तर विवेचन केले आहे. तसेच धर्मांतराचे सुनियंत्रित कारस्थान थोपवून धरण्यासाठी हिंदु समाजाने, हिंदुत्ववादी संघटनांनी आणि केंद्र शासनाने करावयाच्या उपाययोजनाही या ग्रंथात विशद केल्या आहेत. 'शुद्धीकरण' प्रक्रियेविषयी स्वतंत्र प्रकरण या ग्रंथात अंतर्भूत केले आहे. कुंभकर्ण वर्षातील सहा मासच झोपायचा; पण हिंदु समाजरूपी कुंभकर्ण धर्मांतराच्या समस्येविषयी शेकडो वर्षे झोपलेलाच आहे. हा ग्रंथ वाचून धर्मांतराच्या राष्ट्रव्यापी समस्येविषयी हिंदु समाज जागृत व्हावा आणि त्याने धर्मांतराचे परकीय आक्रमण परतवून लावावे, ही ईश्वरचरणी प्रार्थना !